UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

● वर्ष : ९१ ● डिसेंबर २०२३ ● पुरवणी विशेषांक १०

G20

भारत 2023 INDIA

।। श्री विश्वनाथो विजयते ।।

स्थापना : ९ जानेवारी १९२७

प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशो… मंडळ,धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

**पुरवणी अंक १० – डिसेंबर २०२३ (त्रैमासिक)**

- **शके १९४४** • **वर्ष : ९०** • **पुरवणी अंक : १०**

**संपादक मंडळ**

• प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे • प्रा. डॉ. मृदुला वर्मा • प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

• प्रा. डॉ. सुभाष वाघमारे • प्रा. ऋषिकेश काळे • प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे

**✵ प्रकाशक ✵**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१. जागतिक शांतता व प्रगतीसाठी संतांचे योगदान

- डॉ. रविकांत शिंदे ---------- ७

२. आशा बगे यांच्या कथेतून व्यक्त झालेल्या सांगीतिक प्रतिमांचे विश्वशांती आणि विकासासाठी योगदान

- प्रा. प्रियांका अशोक कुंभार ---------- ११

३. जागतिक शांततेत पंडित जवाहरलाल नेहरूंचे योगदान व भूमिका

- प्रा. राधाकिसन पांडुरंग मुठे ---------- १५

४. डॉ. प्रकाश पर्येकार हांच्या कर्थेतल्यान अभिव्यक्त जावपी मानवी मुल्यां, उदरगत आनी शांतताय

- सानिका गांवकार ---------- १९

५. जागतिक प्रगती आणि स्त्रीवादी चळवळ

- डॉ.गजानन लोंढे ---------- २२

६. नीरजा यांच्या कथेतील 'पावसात सूर्य शोधणारी माणसं'मधील शांती व प्रगतीच्या शोधात असलेली सक्षम स्त्री

- चैताली चिदानंद कोळी, डॉ. सुनीता उम्रस्कर ---------- २६

७. संत साहित्यात्यील चिरंतन मूल्ये आणि वैश्विक शांतता

- डॉ.सचिन माधवराव कोतकर ---------- २९

८. जागतिक शांतता व प्रगतीसाठी संतांचे योगदान

- डॉ. उज्ज्वला यशवंत सामंत ---------- ३२

९. जागतिक शांततेसाठी व प्रगतीसाठी संस्कृतीचे योगदान

- प्रा. स्वाती प्रभाकर मगदूम ---------- ३६

१०. जागतिक शांतता व प्रगतीसाठी संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या पसायदानाचे योगदान

- डॉ.रेश्मा रमेश दिवेकर ---------- ३९

११. जागतिक शांतता, प्रगती आणि आजचा वर्तमानकाळ

- प्रा.गणेश जा.मस्के ---------- ४३

# नीरजा यांच्या कथेतील 'पावसात सूर्य शोधणारी माणसं'मधील शांती व प्रगतीच्या शोधात असलेली सक्षम स्त्री

डॉ. सुनीता उम्रस्कर
सह लेखक

चैताली चिदानंद कोळी
लेखक

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा मराठी अध्ययनशाखा - गोवा विद्यापीठ
फोन नंबर- ९५४५२८४८८५, ईमेल- chaitalikoli2618@gmail.com

**गोषवारा**

साहित्याच्या प्रयोजनाबाबत संस्कृत, पाश्चात्य व मराठी साहित्यात आजवर अनेक चर्चा झालेल्या आहेत. आनंद हे सर्वश्रष्ठ प्रयोजन मानले असले तरी साहित्यातून बोधप्राप्ती होते हे नाकारता येत नाही. जागतिक शांतता, प्रगती, समाज, साहित्य या सगळ्यांच्या केंद्रवर्ती असतो तो माणूस. त्यामुळे साहित्यातून त्याच्या जगण्याला उपयुक्त अशी शिकवण मिळत असेल तर निश्चितपणे व्यक्ती प्रगतीच्या मार्गावर जाऊ शकते. स्त्रीच्या व्यक्ती स्वातंत्र्याचा आग्रही पुरस्कार नीरजा यांच्या कथा करतात. नात्यामधील फोलपणा माणसाला अशांतीकडे घेऊन जातो. समाजात शांतता असण्यासाठी मानवी नात्यांमध्ये समंजसपणा, सकारात्मकता या गोष्टी महत्त्वाच्या असतात. साहित्यातून मिळणाऱ्या बोधातून शांतता आणि प्रगती साधता येते.

साहित्याचे प्रयोजन या विषया संदर्भात मराठी साहित्यात आजवर अनेक चर्चा झालेल्या आहेत. साहित्याचे प्रयोजन काय असावे या संदर्भात संस्कृत शास्त्रज्ञांनी आपले विचार नोंदवले आहेत तसेच पाश्चात्य व आधुनिक साहित्यिकांनीही आपली मते या संदर्भात अधोरेखित केली आहेत. साहित्याच्या प्रयोजनाबाबत मराठी साहित्यात दोन भूमिका घेतलेल्या पाहावयास मिळतात. या भूमिका लौकिकतावाद व अलौकिकतावाद म्हणून ओळखल्या जातात. लौकिकतातवाद्यांच्या मते सौंदर्यप्रत्ययाबरोबरीनेच जीवनाचे संवर्धन करणे म्हणजे ज्ञानात्मक व नैतिक दृष्टी देणे हे साहित्याचे एक मुख्य प्रयोजन आहे. याउलट केवळ सौंदर्यनिर्मिती करणे, सौंदर्यानंद देणे हेच साहित्याचे प्रयोजन आहे असे मानणारी अलौकिकतावादी भूमिका आहे. या भूमिकांचा संस्कृत, पाश्चात्य मध्ययुगीन काळात अभ्यासकांनी साहित्याच्या प्रयोजनाबाबत दिलेल्या विविध मतांचा विचार करून समीक्षक वसंत पाटणकर यांनी नोंदवलेला पुढील निष्कर्ष महत्त्वाचा वाटतो. ''प्राचीन व मध्ययुगीन संस्कृत तसेच पाश्चात्य साहित्यपरंपरेत लौकिकतावाद व स्वायत्ततावाद हे दोन्ही संकल्पनाव्यूह अस्तित्वात असले तरी त्यांमध्ये ताणाचे नाते नाही. प्राचीन संस्कृत परंपरेत लौकिकतावादाच्या तुलनेत स्वायत्ततावाद अधिक ठाशीव स्वरूपात आहे, तर प्राचीन पाश्चात्य परंपरेत ती तुलनेने क्षीण स्वरूपात आहे. साहित्यप्रयोजनाबाबत बोध व आनंद हे सूत्र दोन्ही परंपरांमध्ये दिसते.''[१] तात्पर्य साहित्यातून आनंदाची प्रचिती येते व बोधही मिळतो हे आपण मान्य करतो. एकंदरित साहित्य हे व्यक्तीच्या मनावर सकारात्मक परिणाम करण्यासाठी, मार्गदर्शन देण्यासाठी उपयुक्त ठरू शकतं हा मुद्दा आपण नाकारू शकत नाही.

प्रस्तुत निबंधात जागतिक शांतता व प्रगतीसाठी मराठी साहित्याचे योगदान या विषयाच्या संदर्भात लेखिका नीरजा यांच्या 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' या कथासंग्रहाचा विचार केला आहे. नीरजा या आधुनिक काळातील लेखिका आहेत. १९९० नंतरच्या स्त्रीलिखत कथांचा विचार करताना नीरजा यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. त्यांच्या कथा या मूलतः स्त्रीलक्षी आहेत. अशा या लक्षणीय लेखिकेबद्दल समीक्षक सुधा जोशी म्हणतात ''आत्मसन्मानाचे व स्वसामर्थ्याचे भान जपणारी, आधुनिक संवेदनस्वभाव असलेली स्त्री, तिचा दृष्टिकोण हा त्यांच्या कथांच्या निर्मितीतला एक केंद्रवर्ती घटक आहे.''[२] सुधा जोशी यांनी त्यांच्या 'जे दर्पणी बिंबले' या कथासंग्रहातील कथांविषयी दिलेले हे मत त्यांच्या 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' या कथासंग्रहातील कथांच्या अनुषंगाने योग्य वाटते.

लेखक समाजाचा भाग असतो. समाजातून घेतलेल्या चांगल्या वाईट अनुभवांची मांडणी स्वतःच्या प्रतिभेतून लेखक समाजाभिमुख करत असतो. अशा साहित्यकृतीचा सकारात्मक वा नकारात्मक परिणाम वाचकांवर होत असतो. समीक्षक दिगंबर पाध्ये म्हणतात ''साहित्यकृती ही कलावंतनिर्मित कलावस्तू असते. या कलावस्तूंचे समाजावर बरेवाईट परिणाम होतात.''[३] सकारात्मक विचार देणारे साहित्य, उचित दिशा दाखवणारे साहित्य, बोध प्रधान करणारे साहित्य हे निश्चितच माणसाच्या सकारात्मक प्रगतीसाठी उपयुक्त ठरते.

ISSN No. 2394-5990

नीरजा यांचा 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' हा कथासंग्रह बदलत्या काळाचे संदर्भ घेऊन अवतरलेला आहे. स्त्रियांचे मानसिक सक्षमीकरण या दृष्टिने हा कथा संग्रह महत्त्वाचा आहे. स्त्रीच्या विचार स्वातंत्र्याचा आग्रही पुरस्कार या कथासंग्रहातील पहिलीच कथा 'पावसात सूर्य शोधणाऱ्या मुलीची गोष्ट' करते. स्त्रीच्या व्यक्तिस्वातंत्र्याचे तत्त्व या कथेत पाहायला मिळते. प्रस्तुत कथेतील नायिका स्वतंत्रपणे स्वतःविषयी विचार करणारी दिसते. कोणाच्याही दबावाखाली येऊन तिने आजवर कुठलीच गोष्ट केलेली नसते व पुढेही कधी करणार नाही या भूमिकेवर नायिका ठाम असलेली दिसते. ज्या प्रकारे कुटुंब व प्रेम तिला अपेक्षित असते ते न मिळाल्याने घटस्फोट घेण्याच्या निर्णयावर ती ठाम राहते. ''पतिपत्नी हे कितीही भांडले, तंडले तरी त्यांनी स्वतःसाठी नाही पण मुलांसाठी, जगासाठी एकत्र रहायला हवं. घटस्फोट हा शेवटचा पर्याय आहे. तुम्ही दोघं ह्या संसाररथाची दोन चाकं आहात. एक चाक कुरकुरत असेल तर दुसऱ्या चाकानं समजुतीनं आणि खंबीरपणे हा रथ ओढून न्यायचा असतो.''[४] कथेत आलेला हा विचार पाहता समाजात रूढ असलेल्या या विचाराला विरोध करून स्त्री ही एकटी जगू शकते, ती अबला राहिलेली नाही. मानसिक रित्या ती किती सक्षम झाली आहे हे विचार या कथेतून अधोरेखित होतात.

शारीरिक बळामध्ये स्त्री कमी पडत असली तरी मानसिक बळ हे पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या आत अधिक असते. या गोष्टीची जाणीव अनेक स्त्रियांना नसते. सुटका या कथेतील दयाळची पत्नी ललिता याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. दयाळ या व्यक्ती सारखे पुरुष समाजात पाहायला मिळणे यात काही नाविण्य नाही. महाविद्यालयात दयाळा सोबत शिकवणारी रजनी स्वतःच्या मेहनतीने प्राचार्य बनते. डॉक्टर ची पदवी व संस्थापकांशी चांगले संबंध असल्याने तिला प्राचार्य पद मिळाले असा निष्कर्ष दयाळ काढतो. समाजात आजही स्त्रियांची प्रगती पुरुषांना बघवत नाही का असा प्रश्न या प्रसंगावरून आपल्यासमोर उपस्थित होतो. असे असले तरी रजनीला काहीच फरक पडत नाही हा तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष. प्रगतीच्या वाटेवर पाऊल टाकताना असे अनेकजण आपल्याला खाली खेचू पाहतात अशा व्यक्तींना सामोरे जाण्याइतपत आजची स्त्री सक्षम झाली आहे असे म्हणता येते.

नीरजा ह्या आधुनिक काळातील लेखिका आहेत. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेतून निर्माण झालेले महानगर व त्या महानगरातील मध्यमवर्ग त्यांच्या कथेत येतो. गतिमानता हे महानगरांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. जगण्यामध्ये आलेल्या या गतिमानतेच्या आहारी जाऊन मध्यमवर्ग संवेदनशून्य बनत असलेला दिसतो. या संदर्भात 'दुःखोत्सव' ही कथा उल्लेखनीय आहे. कथेत एकत्र कुटुंबपध्दती असली तरी घरात जागा नसल्याने मनाली आणि तिचा नवरा समीर वेगळी खोली करून राहतात. समीरच्या अण्णांचा मूत्यू झाल्यामुळे ते परत घरी येतात. अशा वेळी अण्णांच्या जाण्याने आम्हाला दुःख झालं आहे याचा फक्त देखावा या कथेत पाहायला मिळतो. कथेची ही एक बाजू असली तरी एक स्त्री म्हणून मनालीचे विचार महत्त्वाचे वाटतात. नवऱ्याने आपल्या जवळ असावं असेच तिला वाटत असते परंतु एकत्र कुटुंब पध्दतीमुळे ते शक्य होत नाही. स्त्री आणि पुरुषांमध्ये भेदभाव केल्या जाणाऱ्या कुटुंबात तिला राहायचे नसते. एका स्त्रीला काय हवं आहे या प्रश्नाचे एक स्पष्ट उत्तर म्हणजे 'एकांत' आणि तोही नवऱ्याची सोबत मिळेल असा एकांत. एकत्र कुटुंब पध्दतीत ते शक्य नसल्याने नीरजांने मनालीचे स्वतंत्र विचार या कथेत व्यक्त केले आहेत.

महिषासुराला मारल्यानंतर दुर्गेनं जसा विजयोत्सव साजरा केला असेल तसा उत्सव मनातल्या मनात नवरा मेल्यानंतर साजरा करणारी नायिका 'महिषासुरमर्दिनी' या कथेत येते. औद्योगिक क्रांतीमुळे अनेक गिरण्या बंद पडल्या ही वस्तुस्थिती आहे. सतीचा नवरा विश्राम गिरण्या बंद झाल्यानंतर घरी बसलेल्या पुरुषांपैकी एक आहे. सती स्वतंत्र असून स्वतः पोळ्यांचा व्यवसाय करीत असते. तिला नवरा नकोच असतो संधी मिळाली तर त्याला एक्स्चेंज ऑफरमध्ये देऊन नवा नवरा घ्यायचा असे विचार तिच्या मनात येत असतात. विश्रामचा अपघाती मूत्यू होतो. अशा वेळी नवरा हा सर्वस्व असतो या जून्या विचारांच्या पलीकडे जाऊन सती आनंदी राहते. जीवंतपणे ज्याचा घरासाठी, आपल्यासाठी काहीच उपयोग होत नाही अशा व्यक्तीच्या नसण्याने स्वतःच्या जीवनात काहीच फरक पडणार नाही या विचारांचा स्वीकार सती करते.

महानगरीय वातावरणात रचलेली 'मडकं गेलं वाहून' ही कथा आहे. मुंबईत थोडासाही पाऊस आल्यावर मुंबई बुडते अशा वातावरणात प्राजक्ता पावसात अडकते. अशा प्रसंगात तिचा नवरा अवधूत समंजसपणा न दाखवता तिच्यावरच ओरडतो. पुरुषी अहंकार बाजूला ठेऊन स्वतःच्या बायकोला अशा प्रसंगी साथ द्यायला हवी या जाणीवेचा अभाव अवधूतमध्ये दिसतो. घडलेल्या प्रसंगातून प्राजक्ताला बोधप्राप्ती होते.

**निष्कर्ष :**

जागतिक शांतता, प्रगती, समाज, साहित्य या सगळ्यांच्या केंद्रवर्ती असणारा असतो माणूस. त्यामुळे साहित्यातून त्याच्या जगण्याला उपयुक्त अशी शिकवण मिळत असेल तर निश्चितपणे व्यक्ती प्रगतीच्या मार्गावर जाऊ शकते.

आनंद या प्रयोजना सोबत बोध या प्रयोजनाला साहित्याच्या प्रयोजनात महत्त्वाचे स्थान आहे.

स्त्रीच्या व्यक्ती स्वातंत्र्याचा आग्रही पुरस्कार नीरजा यांच्या कथा करतात.

लेखिका नीरजा यांच्या कथा स्त्रियांना मानसिक दृष्टा सक्षम करण्यास उपयुक्त ठरू शकतात.

स्त्रियांच्या आत असलेल्या अदृश्य शक्तीची जाणीव नीरजा यांच्या कथा करून देतात.

नात्यामधील फोलपणा माणसाला अशांतीकडे घेऊन जातो. समाजात शांतता असण्यासाठी मानवी नात्यांमध्ये समंजसपणा, सकारात्मकता या गोष्टी महत्त्वाच्या असतात.

जागतिक शांतता व प्रगतीसाठी व्यक्तीने प्रसंगानुरुप संवेदनशील असणे महत्त्वाचे आहे याची जाणीव नीरजांच्या कथा करून देतात.

**संदर्भ ग्रंथ :**


- पाठणकर वसंत; साहित्यशास्त्रः स्वरूप आणि समस्या, प्रथम आवृत्ती, पृ. ५३
- धुळेकर नीरजा; जे दर्पणी बिंबले, प्रथम आवृत्ती, मलपृष्ठ
- दिगंबर पाध्ये; साहित्य, समाज आणि संस्कृती, प्रथम आवृत्ती, पृ. २
- नीरजा; पावसात सूर्य शोधणारी माणसं, प्रथम आवृत्ती, २०१२, पृ.१


■■■